**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स डी.बी. (बी.के.सी.) रिएलेटर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स ए.बी.आय.एल. बिल्डकॉन एल.एल.पी. यांचा टाटा कॉलनी (प्लॉट नं.1) आणि भरतनगर ट्रान्झिट कँप (प्लॉट नं.2) सर्व्हे नं.378 (पार्ट संबंधित सी.टी.एस.नं.7643 (पार्ट) कोळे-कल्याण गाव, बी.के.,सी. रोड. बांद्रा (पूर्व), मुंबई येथील मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास व उर्वरित भूखंडातीलप्रकल्प विकासाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा इतिवृतान्त**

-------------------

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१/१२/२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं.व्दारा पत्र क्रं/ एमपीसीबी/जेडी(डब्लुपीसी/ईएनव्ही/पीएच-बी२०१२०२-एफटीएस-००५३दिनांक ०२/१२/२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) जिल्हादंडाधिकारी – मुंबई उपनगर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी) | - | **अध्यक्ष** |
| 2) प्रादेशिक अधिकारी, मुंबई<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई | - | **सदस्य** |
| 3) उप प्रादेशिक अधिकारी,मुंबई-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई | - | **आयोजक** |

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स डी.बी. (बी.के.सी.) रिएलेटर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स ए.बी.आय.एल. बिल्डकॉन एल.एल.पी. यांचा टाटा कॉलनी (प्लॉट नं.1) आणि भरतनगर ट्रान्झिट कँप (प्लॉट नं.2) सर्व्हे नं.३७८ (पार्ट संबंधित सी.टी.एस.नं. ७६४३ (पार्ट) कोळे-कल्याण गाव, बी.के.,सी. रोड. बांद्रा (पूर्व), मुंबई येथीलमोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास व उर्वरित शिल्लक भूखंडातीलप्रकल्पाच्या विकासाबाबत प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी वार बुधवार दिनांक २० जानेवरी, २०२१रोजी दुपारी १२.३० वाजता एक्स-बीकेसी सेल्स ऑफिस बिल्डिंग, म्हाडा कार्यालयासमोर, कलानगर गेट नं. 3 समोर, कलानगर कॉम्प्लेक्स,वांद्रे (पुर्व), मुंबई – ४०० ०५१येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री.अशोक जाधव, प्रभारी- उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (PhysicalPublic Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उर्वरित व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधीदेण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

श्री. अशोक जाधव, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -२, मप्रनि मंडळ, मुंबई तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीडॉ. विकास नाईक, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. अनंत हर्षवर्धन, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तक,प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण तज्ज्ञ व उपस्थित असलेल्या स्थानिक रहिवाशांचे स्वागत केले .

या जनसुनावणीच्या सुरुवातीला अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की या प्रकल्पामुळे बाधित होणारे उपस्थित आहेत काय ? त्यावर आयोजकांनी सर्वांना सुचना /नोटीस देण्यात आलेली असुन त्यानुसार तेथील रहिवासी सुद्धा उपस्थित असल्याचे निदर्शनास आणुन दिले.

त्यानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्प/योजना यांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे .

श्री. अशोक जाधव यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स डी.बी. (बी.के.सी.) रिएलेटर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स ए.बी.आय.एल. बिल्डकॉन एल.एल.पी. यांचा टाटा कॉलनी (प्लॉट नं.1) आणि भरतनगर ट्रान्झिट कॅंप (प्लॉट नं.2)

सर्व्हे नं.378 (पार्ट संबंधित सी.टी.एस.नं. ७६४३ (पार्ट) कोळे-कल्याण गाव, बी.के.,सी. रोड. बांद्रा (पूर्व), मुंबई येथील मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास आणि उर्वरित भूखंडात प्रकल्प विकासाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला .सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी हि पर्यावरण अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच सागरी तटीय विनिमयन अधिनियम दि. ०६/०१/२०११ नुसार घेणे बंधनकारक आहे.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक 20 जानेवारी, २०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक फ्रि प्रेस जर्नल या वृत्तपत्रात दिनांक १५/२/२०२० रोजी मराठी व इंग्रजीत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती.

सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती मा.जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला, शासकिय वसाहत, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०० ०१२, मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई. सहाय्यक आयुक्त, एच /ईस्ट वॉर्ड, महानगरपालिका कार्यालय, बांद्रा, मुंबई, प्रादेशिक अधिकारी/ उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई. इ. ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. अशोक जाधव, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित योजनेबाबत मप्रनि मंडळ कार्यालयास विविध सूचना, आक्षेप प्राप्त झालेले आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी किंवा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले श्री. अशोक जाधव यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांनी केली .

डॉ. अनंत हर्षवर्धन, प्रादेशिक अधिकारी, मुंबई तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण हे महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत्त भाषेत मराठीतून करण्याची सूचना केली.

डॉ. विकास नाईक, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्राधिकृत्त संस्थेच्या प्रतिनिधी / पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले . प्राधिकृत्त संस्थेच्या प्रतिनिधी / पर्यावरण सल्लागारांनी योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

प्रकल्प प्रवर्तक (सीआरझेड सल्लागार) यांना मराठीतून प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजना ह्याबाबत माहिती देण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की हा प्रकल्प मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुर्नविकासाचा प्रकल्प आहे. त्या एकूण 17 इमारती ह्या मोडकळीस आलेल्या होत्या. त्यास मोडकळीस आलेल्या इमारती म्हाडा, महाराष्ट्र शासन, मुंबई महानगर पालिका यांनी घोषित केल्यानंतरच प्रकल्प विकसनास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यांनी मंजूर योजनेबाबत स्पष्टीकरण दिले. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सीआरझेड-1, 2, 3 व 4 असे दर्शविलेले आहे काय याबाबत विचारणा केली.

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की सीआरझेड, २०११ च्या अधिसुचनेतील परिच्छेद 1 च्या तरतुदींनुसार "सीआरझेड ना हरकत प्रमाणपत्र" (CRZ NOC) घेणेपूर्वी म.प्र.नि. मंडळाकडे सादरीकरण करणे बंधनकारक आहे. त्यांनी स्पष्टीकरण दिले की महानगरपालिकेचे निर्बंध आहेत की ब-याच वेळा "सीआरझेड ना हरकत प्रमाणपत्र" (CRZ NOC) घेणेपूर्वी शंका विचारल्या जातात की सर्व "सीआरझेड प्रकल्पाबाबत ना हरकत प्रमाणत्र घ्यायचे की फक्त संबंधित प्रकल्पाबाबत घ्यायचे. तर याबाबत महाराष्ट्र शासनाने व म.प्र.नि.मंडळाने दिलेल्या निर्देशांनुसार जनसुनावणी ही फक्त त्या प्रकल्पातील बाधितांसाठी आयोजित करणे बंधनकारक आहे. संपूर्ण सीआरझेड क्षेत्राची नाही. मात्र एखादा उद्योग उभारणीच्यावेळी त्या उद्योगाच्या परिसरातील बाधित गावांचा विचार होतो, येथे प्रत्यक्ष प्रकल्प व त्यामुळे फक्त बाधित होणारे जनतेचा विचार करावा लागतो.

डॉ. हर्षवर्धन, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी महानगरपालिकेचे निर्बंध आहेत असे स्पष्टीकरण देऊन विचारले की मिठी नदीपासून सीआरझेड अंतर किती आहे? त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मिठी नदीला लागून प्रकल्प नाही, तर मध्ये एक 24 मीटर्सचा रस्ता आहे. यावेळी सदस्य, यांनी सांगितले की याबाबत एक अपिल प्रलंबित आहे. तरी आपणास मिठी रिव्हर ऑथॉरिटीची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू रस्त्यास लागून वाकोला नाला आहे. ती मुख्य नदी म्हणजे मिठी नदी नाही. प्रकल्पात २१ इमारती असून त्यात निवासी, व्यावसायिक व संक्रमण शिबिर यांचा समावेश आहे.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती डॉ. हर्षवर्धन यांनी सांगितले की काही नाल्यांचे सीमांकन (Demarcation) हे करण्यात आलेले नाही. डॉ. हर्षवर्धन सदस्य यांनी सांगितले की 85 नाले असे आहेत की त्यांचे सीमांकन (Demarcation) करण्यात आलेले नाही. मुंबई महानगरपालिकेने बरेच नाले सीमांकन (Demarcation) करण्यास सुरवात केलेली आहे. याबाबत महानगरपालिकेचे सर्व निर्बंध पाळणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेच्या विरुध्द एक हरकत प्रलंबित आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी मंजूरी मिळालेला कोस्टल झोन प्लॅन दाखविला. सर्व इमारती हया मोडकळीस आलेल्या होत्या, त्यामुळे म्हाडा व महाराष्ट्र शासन यांच्या पुर्वपरवानगीने ह्या पाडण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एकूण प्रकल्पातील १0,000 चौरसमीटर हा सीआरझेडमध्ये येतो,तर उर्वरित २५,000 चौरसमीटर हा नॉन-सीआरझेडमध्ये येतो. २0,000 चौरस मीटरपेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असल्याने यास पर्यावरण अनुमती प्राप्त करणे आवश्यक आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प प्रवर्तकांनी विकसनासाठी आवश्यक असणारा टीओआर प्राप्त केलेला आहे. त्यांनी दोन रेन वॉटर हार्व्हेस्टींग प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१. <u>श्री नविन पटेल, रुम नं.४१,बिल्डिंग नं.३-</u>

श्री नविन पटेल यांनी सांगितले की आम्ही प्रकल्प बाधित असून आम्हांस प्रकल्प विकसित हवा आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्पाबाधितांना त्यांचे काही आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थित प्रकल्प बाधितांनी एकत्रितपणे

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सांगितले की आम्हां सर्वांनाच प्रकल्प लवकारात लवकर विकसीत केलेला हवा असून आमच्या सर्वांचा प्रकल्पास पाठिंबा आहे.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आपल्या काही सूचना वा टीकाटिप्पणी असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सर्वांनीच एकत्रित प्रकल्प विकासास पाठिंबा दिला.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प बाधितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी उपस्थित करण्याची सूचना केली.

२. **श्री जहिर बागी, १२ नं.बिल्डींग, गाळा नं. २८५ -**
३. **श्री इब्राहिम बागवा, बिल्डींग नं. १७, गाळा नं. ४०६ -**
४. **श्री महंमद बागवा, युनिट नं. २७४ व बिल्डिंग नं. २१४१८**
५. **श्रीमती उषा बिल्डिंग नं.११,**

या सर्वांनी सांगितले की ते सर्व प्रकल्प बाधित असून त्यांचा प्रकल्प विकसनास पाठिंबा आहे.

प्रकल्पाच्या सीआरझेड सल्लागार यांनी सांगितले की अस्तित्वातील सर्व इमारती ह्या पूर्णपणे मोडकळीस व धोकादायक होत्या. त्या नियमांनुसार जमिनदोस्त करण्यात आलेल्या असून पूर्णपणे नविन तीन बिल्डिंग होणार आहेत. दोन व्यावसायिक व एक निवासी, दोन ग्राऊंड प्लस 16 व एक ग्राऊंड प्लस 29.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सहमती दर्शविताना सांगितले की सर्वांचाच विचार करण्यात यावा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प चांगला व्हावा म्हणून प्रकल्प बाधित व इतर प्रकल्प बाधित नसणारे पण भविष्यात प्रकल्पात सहभागी म्हणजे सभासद होणारे यांना सूचना वा आक्षेप नोंदविण्याची करण्याची संधि देण्यात यावी अशी सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सूचनांचे स्वागत होईल. संबंधित व्यक्ती, संस्था हया प्रकल्प कार्यालयात वा म.प्र.नि. मंडळ कार्यालयात सूचना देऊ शकतात.

श्री जहिर बागी, १२ नं.बिल्डींग, २८५ यांनी सूचना केली की आम्हांला एक माहिती हवी आहे. प्रकल्पबाधित इमारती ज्या सीआरझेडमध्ये आहेत, त्यांचा विचार केलेला आहे. पण ज्या नविन इमारती बाधित नाहित, त्यांच्याबाबत धोरण काय असेल. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जर बाधित इमारतींमुळे नविन इमारतींना काही अडचण येत असेल, तर त्यांचाही विचार करावा लागेल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितींना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही उपस्थितांना त्यांच्या काही शंका, सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीचे इतिवृत्त तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाला, प्राप्त झालेल्या लेखी सूचना या सोबत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई , यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व माननीय अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

अ.गो. जाधव

**(श्री. अशोक जाधव)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई – २,
मप्रनि मंडळ,
मुंबई

**(डॉ. अनंत हर्षवर्धन)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
मुंबई

**(डॉ. विकास नाईक)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी – मुंबई उपनगर,
मुंबई